# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.02.2026** **वारःसोमवार**

•राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीची आज मतमोजणी

•उद्योजकांनी राज्याचे दूत म्हणून काम करावं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन

•परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात आज पंतप्रधान देशभरातल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधणार

आणि

•पुणे महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदासाठी आज निवडणूक

**जि.परिषद निवडणूक निकाल**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांची मतमोजणी आज होणार आहे. सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरूवात होईल. यासाठी राज्य निवडणूक आयोगानं सुरक्षेसह सर्व व्यवस्था

केली आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांसाठी शनिवारी मतदान झालं; राज्यात सरासरी ६८ पूर्णांक २८ शतांश टक्के मतदान झाल्याचं राज्य निवडणूक आयोगानं कळवलं आहे. सर्वाधिक ७४ पूर्णांक ८९ शतांश टक्के मतदान परभणी इथं, तर सर्वात कमी ५५ पूर्णांक ७९ शतांश टक्के इतकं मतदान रत्नागिरीत झालं.

**मुख्यमंत्री अहिल्यानगर**

उद्योजकांनी राज्याचे दूत म्हणून काम करावं, असं आवाहन करत उद्योगांना सर्वोतोपरी सहकार्य दिलं जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा एमआयडीसी परिसरात तौरल इंडिया कंपनीच्या अत्याधुनिक प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते. राज्यात परकीय गुंतवणुकीतून उभ्या राहात असलेल्या उद्योगांची संख्या वाढत असून, ७५ टक्के करार हे प्रत्यक्षात उतरत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले,

**फडणवीस Byte**

SCRIPT - यावेळी आम्ही उत्तर महाराष्ट्रातले जे पाचही जिल्हे आहेत या पाचही जिल्ह्यांमध्ये त्या ठिकाणी गुंतवणूक आणण्यास यशस्वी झालो जवळपास पन्नास हजार कोटी रुपयांची गुंतवणूक ही उत्तर महाराष्ट्राच्या या पाच जिल्ह्यांमध्ये या ठिकाणी आपण आणली आणि त्यात एकट्या नगर

जिल्ह्याचा विचार केला तर जवळपास अकरा हजार पाचशे एकोणीस कोटी रुपयांची गुंतवणूक ही या नगर जिल्ह्यात होणार आहे ज्यातनं अठरा हजार लोकांना त्या ठिकाणी रोजगार मिळणार आहे आणि उत्तर महाराष्ट्रामध्ये जवळपास पंच्याहत्तर हजार लोकांना रोजगार मिळेल इतक्या मोठ्या प्रमाणात ही गुंतवणूक या ठिकाणी येते आहे

उद्योगांसाठी पुढील पाच वर्षे वीज दर स्थिर ठेवण्याचे किंवा कमी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. औद्योगिक वसाहतींमध्ये गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही; उद्योजकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस प्रशासनाला देण्यात आल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<u>मुख्यमंत्री नाशिक</u>**

आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ओझर इथल्या विमानतळाच्या नव्या पॅसेंजर टर्मिनलचं भूमिपूजनही काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. हे विमानतळ विकासाची भरारी घेणारे ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ओझर विमानतळाच्या या विस्तारित पॅसेंजर टर्मिनलमुळे औद्योगिक विकासाला चालना मिळेल; त्याचबरोबर नाशिक मधील शेतकरी, युरोप आणि अमेरिकेतही शेतमालाची निर्यात करू असं फडणवीस म्हणाले. सुमारे साडेसहाशे कोटी रुपयांच्या या टर्मिनलच्या नव्या इमारतीमुळे सध्याच्या प्रवासी क्षमतेच्या तिप्पट प्रवासी वापर करू शकतील.

**<u>मुख्यमंत्री नाशिक</u>**

तीर्थकारांनी दिलेला अहिंसा, शांती आणि करुणेचा संदेश जैन बांधवासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवतेसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक जिल्ह्यातील मालसाणे इथल्या णमोकार तीर्थ इथं केलं. त्यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक प्रतिष्ठा आणि महामस्तकाभिषेक महोत्सव पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

**<u>परीक्षापेचर्चा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 'परीक्षा पे चर्चा २०२६' च्या नवव्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात देशभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. हा कार्यक्रम, सकाळी १० वाजता, विविध प्रसार माध्यमांतून प्रसारित होणार आहे. दहावी, बारावीच्या परीक्षा जवळ येत असल्यानं, परीक्षेचा ताण, परीक्षेची तयारी, वेळेचं व्यवस्थापन तसंच विद्यार्थ्यांनी या परीक्षांना आत्मविश्वासानं कसं सामोरं जावं यावर या कार्यक्रमात पंतप्रधान विद्यार्थ्यांशी चर्चा करतील.

**<u>महापौरनिवडणूक</u>**

पुण्याच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक आज सकाळी 11 वाजता, महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात होणार आहे.

भाजपातर्फे महापौर पदासाठी मंजुषा नागपुरे तर उपमहापौर पदासाठी रिपब्लिकन पक्षाच्या आठवले गटाचे परशुराम वाडेकर यांनी अर्ज दाखल केले आहेत. काँग्रेसकडून अश्विनी लांडगे आणि साहिल केदारी यांनी; तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून शीतल सावंत आणि दत्ता बहिरट यांनी अर्ज दाखल केले आहेत. संख्याबळाचा विचार करता भाजपचा विजय निश्चित मानला जात आहे.

दरम्यान महापालिकेच्या स्थायी समितीसह अन्य विषय समित्यांची निवडणूक येत्या शुक्रवारी होणार आहे.

**बस**

येत्या काही दिवसात एसटीच्या ताफ्यात अत्याधुनिक नवीन ५५ आसनी बस जमा होणार असल्याची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल केली. या गाड्यांना राजमाता जिजाऊ यांचं नाव दिलं जाणार असून मार्च महिन्यापासून गर्दीच्या मार्गांवर या बसची सेवा सुरू होईल असं त्यांनी सांगितलं. या बसगाड्या राज्याची परंपरा आणि अभिमानाचं चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत, या गाड्यांमुळे गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना दिलासा मिळेल असं सरनाईक म्हणाले.

**म्हाडासोडत**

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीएसह सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतील ४ हजार १८६ सदनिकांच्या विक्रीसाठी उद्या दुपारी १२ वाजता पुण्यात संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे. २ लाख ५८ हजार ८३२ प्राप्त अर्जापैकी, अनामत रक्कम भरलेल्या २ लाख १५ हजार ९६५ अर्जदारांचा सोडतीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

**गजानन महाराज प्रकाटदिन**

संत श्री गजानन महाराज यांचा १४८वा प्रकट दिन काल शेगांवसह राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त सर्वत्र विविध धार्मिक कार्यक्रमांसह महाप्रसादाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**भीमाशंकर**

नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिरात विविध विकसकामं सुरू आहेत, त्यामुळे या वर्षी महाशिवरात्रीच्या कालावधीतही भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद राहणार आहे.

भाविकांनी मंदिर संस्थान, तसंच प्रशासनाला सहकार्य करावं असं आवाहन पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केलं आहे.

**अंध गिर्यारोहक**

पुण्यातील गिरीकूजन संस्थेच्या ३५व्या वर्धापनदिनानिमित्त, गेल्या शुक्रवारी 24 दृष्टीहीन मुला-मुलींनी राजगड गिर्यारोहण यशस्वी पूर्ण केलं. संस्थेच्या 28 स्वयंसेवकांनी प्रत्येक सहभागी मुलांची काळजी घेत, त्यांना मार्गदर्शन केलं. विशेष म्हणजे गड चढायला केवळ दिड तास लागला. गिर्यारोहणात ही मुले सर्वसाधारण मुलांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाहीत, त्यांचा उत्साह आणि कौशल्य थक्क करणारी असल्याचं आयोजकानी म्हटलं आहे.

**विष्णु मनोहर विक्रम**

गडचिरोली इथं आयोजित 'कोया कृषी कुंभ २०२६' या महोत्सवात काल पाककला तज्ञ विष्णू मनोहर यांच्या नेतृत्वात १ हजार १११ किलो नाचणीचा शिरा तयार करून जागतिक विक्रम प्रस्थापित करण्यात आला. गडचिरोली जिल्ह्यातील भरडधान्ये, विशेषतः नाचणी पिकाचे पोषणमूल्य आणि महत्त्व राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित करणे असा या उपक्रमाचा उद्देश होता.

**नाशिक सायक्लोथॉन**

फिट इंडियाच्या संडे ऑन सायकल या उपक्रमा अंतर्गत किड्स सायक्लोथॉन हा उपक्रम काल नाशिकमध्ये उत्साहात पार पडला. लहान मुलांमध्ये सायकल चालविण्याची आवड निर्माण करणं, आरोग्याविषयक जागरूकता वाढवणं तसंच वाहतूक सुरक्षेचं महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशानं या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाच्या निमित्तानं नाशिक पोलीस दलातर्फे शस्त्र प्रदर्शनाचंही आयोजन करण्यात आलं होतं.

**हवामान**

येत्या २४ तासात संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.